**प्रेस नोट** **दिनांक ०४/०८/२०२६**

**<u>सर जे.जे. मार्ग पोलीस ठाण्याच्या पथकाने एम.टी.एन.एल भुमीगत कॉपर केबल चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय टोळीचे ०२ गुन्हे उघडकीस आणलेबाबत.</u>**

दिनांक ०२/०८/२०२६ रोजी बर्कले पॅलेस,रेल्वे कॉलनी लगत असलेल्या फूटपाथवर, मुंबई येथे काही इसम खोदकाम करून केबल चोरी करत असुन तात्काळ पोलीस पथकाने तेथे छापा टाकुन दोन इसमांना त्यांच्याकडील खोदकामाच्या साहित्य कुदळ, फावडा व कटर यांच्यासह पकडले होते. सदरवेळी झालेल्या झटापटीत त्याचे दोन साथीदार हे टेम्पो व चोरलेले मालमत्तेसह पळुन गेल्याने, सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. ५७७/२०२६ अन्वये कलम ३०३ (२), ६२ व ३ (५) भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यानंतर नमूद गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी नामे १) मोहम्मद सरवर मो. अनवर अन्सारी, वय ३५ वर्षे, २) आसिफ दिलदार सय्यद ,वय २७ वर्षे आणि ३) आझम फक्रुद्दीन कुरेशी, वय-३४ वर्षे अशा एकूण तीन्ही आरोपींना अटक केलेली आहे.

तसेच दिनांक ०४/०८/२०२६ रोजी पहाटे गोपनीय माहिती मिळाल्यावरून पोलीस पथकाने बर्कली पॅलेस, रेल्वे कॉलनी समोरील फुटपाथ येथे छापा टाकला असता तेथे चार इसम हे कटरच्या सहाय्याने एम टी एन एल ची केबल कटींग करताना आढळले. त्याकरिता नमुद आरोपीतांनी जमीन खोदण्यासाठी जेसीबी वाहन आणले होते. तसेच चोरलेली केबल घेवुन जाण्यासाठी आयशर टेम्पोमध्ये भरत होते. सदरवेळी पोलीस पथकाने चारही इसमांना त्यांच्याकडील जेसीबी, आयशर टेम्पो, एक कार, कटर तसेच ७० मीटर कॉपर केबल आणि ०१ होंडा सीव्हीक मोटार कार वगैरे अंदाजे एकूण ५५ लाख रूपयांचे साहित्य ताब्यात घेवुन चारही इसमांविरूध्द गु.र.क्र. ५८०/२०२६ अन्वये कलम ३०३ (२) व ३ (५) भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी नामे १) सलमान अक्रम अली अन्सारी, वय २३ वर्षे, २) सुफियान फकरुद्दीन कुरेशी, वय २५ वर्षे ३) जुनेद जावेद अहमद, वय २६ वर्षे आणि ४) मोहम्मद बबलु मोहम्मद रजी शेख, वय ३८ वर्षे अशा एकूण चारही आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदर दोन्ही दाखल गुन्हयांच्या तपासा दरम्यान आरोपी हे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने जेसीबी व इतर वाहनांच्या सहाय्याने भूमिगत कॉपर केबल चोरी करीत असल्याचे तसेच अधिकृत काम सुरू असल्याचा खोटा आभास निर्माण करून गुन्हे करण्याची विशिष्ट कार्यपद्धती अवलंबत असल्याचे दिसत आहे. त्यांची आंतरराज्यीय टोळी असुन त्यांचे साथीदारांच्या मदतीने परराज्यात चोरलेली मालमत्ता विक्री करत असल्याचे निष्पन्न होत आहे. त्याबाबत सर जे. जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून सखोल तपास चालू आहे.

सदर उल्लेखनिय कारवाई मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. डॉ. मनोकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उपायुक्त, दक्षिण परिमंडळ १, मुंबई श्री. मनीष कलवानिया, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डोंगरी विभाग, मुंबई, श्री. तनवीर शेख यांचे मार्गदर्शना खालील सर जे.जे. मार्ग पोलीस ठाण्याचे श्री. रईस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.एम.बी.वाघमोडे पोनि (गुन्हे), पोनि सुरेश चोरट, सहाय्यक पोलीस निरीक्षक मल्लय्या स्वामी, सहाय्यक पोलीस निरीक्षक रंजन पवार, पोलीस उप निरीक्षक प्रशांत आमुंडकर, महिला पोलीस उप निरीक्षक अंजली बाबर, पो.ह. प्रितेश शिंदे, शशिकांत जाधव, न्याजोद्दीन तडवी, मंदार घाडगे, भारत बोडके, पो.शि.संदीप भोळे, जगन काळे, अमोल धात्रक यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.